**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **ज्येष्ठ उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार; सर्व स्तरांतून रतन टाटा यांना आदरांजली अर्पण.**
- **उद्योगपती रतन टाटा यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्ताव आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत संमत.**
- **अंगणवाड्यांमध्ये ३४५ पाळणाघरे सुरू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता; आपले सरकार केंद्र चालकांनाही ग्रामरोजगार सेवकांप्रमाणे मानधन देण्याचा निर्णय.**
- **नागपुरातील दीक्षाभूमी इथं ६८व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने आजपासून धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ, देशभरातून शेकडो नागरिक दीक्षाभूमीवर दाखल.**

रतन टाटा निधन

ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी मुंबईत वरळी स्मशानभूमी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेन्द्र फडणवीस, मंत्री पियुष गोयल, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित होते. ज्येष्ठ उद्योगपती, टाटा सन्सचे मानद अध्यक्ष आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांचं काल रात्री मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांना दोन दिवसांपूर्वी दाखल करण्यात आलं होतं. उपचारांदरम्यान काल रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. रतन टाटा यांच्या सन्मानार्थ राज्य सरकारने आज एक दिवसाचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. सांस्कृतिक कला केंद्र इथं टाटा यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख शरद पवार, खासदार प्रफुल पटेल, सुप्रिया सुळे, उद्योगपती कुमारमंगलम बिर्ला, रिजर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास,

लेखक विश्लेषक सुहेल सेठ यांनी सांस्कृतिक कला केंद्र इथं जाऊन टाटा यांचं अंत्यदर्शन घेतलं. विविध देशांच्या मुंबईतल्या दूतावासांचे राजदूत, पोलीस खात्याचे वरिष्ठ अधिकारी टाटांच्या अंत्यदर्शनासाठी पोहोचले. रतन टाटा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांच्यासह सर्वच क्षेत्रातल्या मान्यवरांनी दु:ख व्यक्त केलं आहे. २८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबईत जन्मलेले रतन टाटा यांनी उद्योग क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातही भरीव कार्य केलं. १९९० ते २०१२ पर्यंत टाटा समूहाचे अध्यक्ष, ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ दरम्यान टाटा समूहाचे अंतरिम अध्यक्ष आणि अनेक वर्षं टाटा समूहाच्या चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिलं. टाटा सन्स, टाटा इंडस्ट्रीज, टाटा मोटर्स, टाटा स्टील आणि टाटा केमिकल्सचे अध्यक्ष एमेरिट्स हे मानद पद त्यांना बहाल करण्यात आलं होतं. रतन टाटा यांना २००० साली पद्मभूषण, तर २००८ मध्ये पद्मविभूषण या नागरी सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं. नोव्हेंबर २००७ मध्ये, फॉर्च्युन मासिकाने उद्योग जगतातील २५ सर्वात प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत त्यांचा समावेश केला होता. वर्ष २०१७ मध्ये डॉक्टर आबाजी थत्ते अनुसंधान संस्थेअंतर्गत नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या पहिल्या टप्प्याचा आरंभ नागपुरात झाला. त्यावेळी रतन टाटा यांनी त्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. याशिवाय रतन टाटा यांच्या एकोणअंशीव्या वाढदिवसाला ते नागपुरातील संघ मुख्यालयात डॉ.मोहन भागवत यांची भेट घेण्यासाठी आले होते. नागपूरची प्रसिद्ध एम्प्रेस मिल ही जमशेदजी टाटा यांच्या राष्ट्र उभारणीच्या कार्यातील मैलाचा दगड म्हणता येईल.

शोक प्रस्ताव/ भारतरत्न विनंती

ज्येष्ठ उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा शोकप्रस्ताव बैठकीत मांडला. यावेळी रतन टाटा यांचं कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही संमत करण्यात आला. उद्यमशीलता हा देखील समाजउभारणीचा प्रभावी मार्ग असतो. नवनवीन उद्योगांच्या उभारणीनेच देश प्रगतीपथावर नेता येतो, मात्र त्यासाठी हृदयात निस्सीम देशप्रेम आणि आपल्या समाजाप्रति तितकाच प्रामाणिक कळवळा हवा. रतन टाटा यांच्या रूपाने आपण अशाच विचारांचा एक समाजसेवी, द्रष्टा आणि देशप्रेमी मार्गदर्शक गमावला.

भारताच्या उद्योगक्षेत्रातच नव्हे, तर समाजउभारणीच्या कामातही टाटा यांचं अपूर्व योगदान होतं. ते महाराष्ट्राचे सुपुत्र होते. भारताचा अभिमान होते. स्वयंशिस्त, स्वच्छ कारभार आणि मोठमोठे उद्योग सांभाळताना पाळलेली उच्च प्रतीची नैतिक मूल्यं यांद्वारे त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटवला. त्यांच्या रूपाने देशाचा एक प्रमुख आधारस्तंभ कोसळला आहे, असं या शोकप्रस्तावात म्हटलं आहे. महाराष्ट्र सरकारचा पहिला 'उद्योग रत्न' हा पुरस्कार रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला होता.

मंत्रिमंडळ निर्णय

अंगणवाड्यांमध्ये ३४५ पाळणाघरं सुरू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या पाळणाघरांमध्ये पाळणा सेविका, पाळणा मदतनीस अशी प्रत्येकी एक पद निर्माण करण्यात येतील. यासाठी साठ टक्के खर्च केंद्र तर चाळीस टक्के खर्च राज्य शासन करेल. राज्यात वाचन संस्कृती, ग्रंथ चळवळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली असून नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यासक्रम तसेच अतिरिक्त तुकड्यांसाठी अर्ज करण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय आज घेण्यात आला आहे. जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित सहा हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी केंद्रचालकांना ग्रामरोजगार सेवकांच्या धर्तीवर दरमहा दहा हजार रुपये मानधन ग्रामपंचायीतमार्फत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पामुळे पंचायत राज संस्थांचा कारभार संगणीकृत होऊन ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसूत्रता आणि पारदर्शकता आणणे शक्य झालं आहे. मंत्रिमंडळ बैठकीत आज झालेल्या अन्य निर्णयात नागपूर नजीकच्या सावनेरसह राज्यातील कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे, कठापूर, लातूरच्या विविध जलसंपदा प्रकल्पांच्या कामांना मान्यता देण्याचा निर्णय सामील आहे. तसेच राज्यातील पत्रकार तसेच वृत्तपत्र

विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या दोन्ही घटकांची महामंडळे स्थापन करावीत, अशी आग्रही मागणी होती. पत्रकार, तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणासाठीच्या विविध योजना या महामंडळांमार्फत चालवण्यात येतील. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अध्यादेशाच्या प्रारूपास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठीचा हा अध्यादेश विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. दरम्यान, धर्मादाय रुग्णालयांमध्ये एकूण 186 धर्मादाय आरोग्य सेवकांची बाह्यस्त्रोतानं नेमणूक करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री तथा विधी आणि न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विभागामार्फत घेण्यात आला आहे. ही पदं धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत भरण्यात येणार आहेत.

पोर्शे कार अपघात प्रकरण

भरधाव वेगाने गाडी चालवून दोन जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या पोर्शे कार अपघातातील आरोपीला ३०० शब्दांचा निबंध लिहिणे, पोलिसांसोबत काही दिवस काम करणे अशा माफक अटींवर जामीन देण्यात आला होता. त्या प्रकरणाच्या चौकशीनंतर राज्य सरकारने पुण्यातील बाल न्याय मंडळातील संबंधित दोन अधिकाऱ्यांना बडतर्फ केलं असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं सांगितलं आहे. या दोन अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी ५ अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आली होती. या चौकशीनंतर जुलैमध्ये १५० पानांचा अहवाल सादर करण्यात आला होता. त्यानुसार या दोन अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर केल्याचा प्रकार समोर आला होता. यानंतर विभागानं त्यांच्याविरोधात कारवाई करत त्यांना बडतर्फ केलं आहे. कविता थोरात आणि एल एन धनावडे अशी या बडतर्फ करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावं आहेत.

धम्मदीक्षा सोहळा

नागपुरातील दीक्षाभूमी इथं ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने आजपासून धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. हा धम्मदीक्षा सोहळा तीन दिवस चालणार आहे. आज सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन

सुरई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत भिक्खू संघातर्फे शेकडो उपासक आणि श्रामणेर यांना धम्मदीक्षा देण्यात आली. यावेळी दीक्षा घेणाऱ्या नागरिकांना बुद्ध वंदना, 22 प्रतिज्ञांचं पठण करून धम्मदीक्षा विधी पार पाडण्यात आला. दीक्षा घेण्यासाठी देशभरातून शेकडो नागरिक दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा परवा दि. १२ ऑक्टोबरला सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून उत्तरप्रदेशच्या कुशीनगर इथले भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए.ए.बी.ज्ञानेश्वर आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा असतील.

वर्धा जिल्हा विकास कामे

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित प्रकल्पांतर्गत तिसऱ्या टप्प्याचं तसंच केंद्र शासनाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या देवळी, वर्धा आणि कारंजा तालुक्यातील विविध कामांचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई इथून उद्या सकाळी 11 वाजता आभासी पध्दतीने होणार आहे. या प्रत्येक कामाच्या ठिकाणी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार अमर काळे, तसंच आमदारांसह लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

हवामान

नागपूर, वर्धा, चंद्रपूर,गडचिरोली, अमरावती आणि अकोला इथं आज तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याशिवाय यवतमाळ, बुलढाणा, वाशिम इथे आज आणि उद्या अशाच प्रकारचं पर्जन्यमान राहण्याची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात 14 ऑक्टोबरपर्यंत हवामान सामान्य राहील.

*****